नियमीत फौजदारी खटला क्रमांकः ४७२/२०१९
शासन विरुध्द मो. रफिक वगैरे
निशाणी क्रमांक **७२**

**अभियोग पक्षाचा साक्षीदार क्रमांक १ ची जबानी**

**शपथेवर सत्य निवेदन करते की,**

माझे नावः– **निलोफर नजरुद्दीन शेख**
वयः– ४० धंदाः– काही नाही.
राः– बेलापूर, नवीमुंबई.

**सरतपासणी अभियोग पक्षाकरिता सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती भा. भ. भोसले**.

**१.** मी आरोपींना ओळखते. मो. रफिक नझीर शेख हे माझे पती आहेत. फातीमा ही माझी सासू आहे. शबाना, फरझाना, इरफाना हया नणंदा आहेत. जावेद हा दिर आहे व सना ही माझी जाउ आहे.

**२.** माझे लग्न दिनांक १३/१२/२००६ रोजी कुर्ला येथील स्वामी विवेकानंद हॉल मध्ये झाले. ते लग्न धर्म रितीरिवाजाप्रमाणे झाले होते. त्यावेळी माझ्या आईने मला दागिने दिले होते. त्यामध्ये दोन तोळयाचा हार, एक तोळयाचे कानातले व एक तोळयाची चेन, एक तोळयाची अंगठी, टायटनचे घडयाळ माझ्या पतीला दिले होते. त्यांनी मला तीन तोळयाचे मंगळसूत्र व पैंजण दिले होते. माझ्या आईने घरातील सर्व उपयोगी वस्तू जसे की, बेड, टीव्ही, इतर भांडीकुंडी दिले होते.

**३.** लग्नानंतर एक महिना सर्व काही ठीक होते. त्यादरम्यान दिवसभर आम्ही सय्यदवाडी, ठाकूरवाड येथे राहायचो व संध्याकाळी वरळी येथे आमच्या घरी जायचो. सय्यदवाडी येथे माझ्या सास–याचे घर होते. तिथे जागा नसल्यामुळे वरळीला रात्री राहण्यासाठी खोली घेतली होती. आम्ही तेथे जायचो. सय्यदवाडी येथे राहत असताना माझ्याकडून कामामध्ये काही कमीजास्त झाले की माझ्या आईला फोन करायचे व सांगायचे की, हिला माहेरी घेवून जा. ते मला खूप त्रास दयायचे. माझ्या पतीचा एक भाउ मानसिक रुग्ण होता. माझा पती मला म्हणायचा की, त्याला धक्का देवून त्याच्या भावाला मी धकलून दिले असे सांगायला सांगेन

**४.** एकवेळी माझ्या पतीने माझ्या अंगावर रॉकेल ओतले होते. वरळी येथे गेल्यानंतर तो मला केवळ दहा रुपये दयायचा व त्याच्यातच सर्व काही कर असे सांगायचा. मला दिवसभर उपाशी ठेवायचा.

**५.** तो प्रत्येकवेळी मला माहेरुन व्यवसायासाठी पैसे घेवून ये असे म्हणायचा. एकवेळी त्याने माझ्याविरोधात तक्रार दिली होती. मी त्याला त्यावेळी म्हणाले की, मी देखील तक्रार करेन. त्यानंतर त्याने ती तक्रार परत घेवून माझी एका कागदावर सही घेतली होती. कोर्टासमोर माझी केवळ एक सही घेतली होती. घरी नेल्यानंतर घरातील इतर मंडळींनी देखील त्यावर सहया केल्या व माझ्याही ब–याच सहया घेतल्या होत्या.

**मध्यान्हाची वेळ झाल्याने सरतपास तहकूब**.

दिनांकः २३/०१/२०२३ समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

स्वा./–
(सुहास प्र. भोसले)
महानगर दंडाधिकारी,
६२ वे न्यायालय, दादर, मुंबई

**शपथेवर पुढील सरतपास पुन्हा सुरु.**

**६.** माझे पती मला नेहमी म्हणायचे की, तू बियरबारमध्ये काम करते, तुझी आई देखील बियरबारमध्ये काम करते. कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीबरोबर माझे प्रेमसंबंध आहेत असेही ते म्हणायचे. माझे पती व सासरच्या इतर मंडळीचे असे म्हणणे होते की, हुंडयामध्ये रोख स्वरुपात रक्कम मिळाली नाही. त्यासाठी ते मला त्रास दयायचे. ते मला माहेरहून एक लाख रुपये घेवून ये असे म्हणायचे. माझे पतीला स्वतःचा व्यवसाय करायचा आहे असे म्हणून तो पैशांची मागणी करायचा. मी गरोदर असताना पैशांच्या मागणीवरुन मला घरातून हाकलून दिले होते. माझ्या माहेरच्या लोकांनी त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर मी मुलाला जन्म दिला. त्यानंतरही त्यांच्या वागण्यात बदल झाला नाही. त्यानंतर मी वरळी येथे गेले. मी स्वतःहून वरळी येथे राहता येईल याकरिता तेथे गेले होते व खोलीचे कुलूप तोडले होते. त्यावेळी मी माझ्या पतीला कॉल करुन बोलावले. त्यावेळी तो तेथे आला. पुन्हा त्याने खोलीला कुलूप लावले व मी दहा दिवसांनी येईल असे सांगितले. पण तो आला नाही. माझे सगळे साहित्य वरळी येथील घरीच राहीले.

**७.** ज्यावेळी आरोपी क्र. १ ने माझ्या अंगावर रॉकेल ओतले होते, त्यावेळी मी वरळी पोलीस ठाण्यात गेले होते. पोलीसांनी मला पोदार रुग्णालयात पाठवले. तेथे सर्व सासरचे लोक आले होते व यापुढे असे होणार नाही असे म्हणाले. त्यावेळी त्यांनी माझी माफी मागितली. त्यावेळी माझ्या आईनेही मला सांगितले की, त्यांना एक संधी दे. त्यांना संधी

दिल्यानंतरही आरोपींच्या वागण्यात बदल झाला नाही. त्यानंतर त्यांनी मला घराबाहेर काढले. त्यानंतर मी पोलीसात तक्रार दिली. ती तक्रार आता मला दाखवण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. तक्रार **नि. क्र. ७३** वर आहे.

८. मी आरोपींना ओळखते. पैकी आरोपी क्र. ६ आज न्यायालयासमक्ष हजर आहे. (नि. क्र. ७१ नुसार इतर आरोपींची हजेरी माफ करण्यात आली.)

**सरतपास पुर्ण...**

**उलट तपास आरोपीकरिता श्री. बनसोडे वकील साहेब यांच्याकडुन**

**९.** निलोफर नझरुद्दीन शेख हे माझे लग्नापूर्वीचे नाव आहे. माझ्या तक्रारीमध्ये माझे माहेरचे नाव लावलेले नाही. दागिन्यांच्या पावत्या मी पोलीसांना दिल्या होत्या की नाही मला आठवत नाही. हे मला आठवत नाही की, ही तक्रार देण्यापूर्वी मी मंत्रालयात तक्रार दिली होती किंवा कसे. मी डबल बीए बीएड आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती टॅक्सी चालक आहेत. साक्षीदार स्वतः सांगते की, तो कंपनीत नोकरी करायचा. फावल्यावेळी टॅक्सी चालवायचा. तो बारावी पर्यत शिकला आहे.

**१०.** आता मला एक समझेता पत्र दाखवले. त्यावर माझी सही व छायाचित्र आहे. पण त्याबाबत माझे असे म्हणणे आहे की, सरतपासणीत मी उल्लेख केलेला दस्त ज्यावर आरोपींनी माझ्या सहया घेतल्या होत्या ते हे कागदपत्र आहेत. आता मला हमीपत्र दाखवले. त्यावरही माझी अशीच सही घेतली होती. हे मला माहित नाही की, तो दस्त नोटरी वकीलांपुढे नोंदवला गेला होता किंवा कसे.

**११.** हे म्हणणे खरे नाही की, मी सासरहून माझे सर्व स्त्रीधन घेवून गेले होते त्यामुळे माझ्या पतीने माझ्याविरुध्द तक्रार नोंदवली होती. हे मला माहित नाही की, आरोपी क्र. १ ने माझ्याविरुध्द तक्रार दिली होती. आरोपींनी कोणत्या तारखेला दागिने व रक्कमेची मागणी केली हे मला सांगता येणार नाही.

**१२.** मी वरळीला असताना आरोपी क्र. १ मला दहा रुपये देवून जायचा असे मी तक्रार देताना पोलीसांना सांगितले होते. परंतु, पोलीसांनी सांगितले की, केवळ महत्वाच्या महत्वाच्या बाबी आम्ही लिहू. माझ्या आईने संसारउपयोगी वस्तू मला दिल्या होत्या असे मी तक्रारीमध्ये सांगितले होते. आरोपी मला टोमणे मारायचे असे मी तक्रार देताना सांगितले

होते. मला मराठी लिहिता वाचता येते.

**१३.** नेहरुनगर पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी कोणी सांगितले नव्हते. साक्षीदार स्वतः सांगते की, मी वरळी पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेले होते. तेव्हा वरळी पोलीसांनी सांगितले की, तुम्ही आता माहेरी राहता तेव्हा आता तेथेच तक्रार दया.

**१४.** हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना तक्रार मागे घेण्यासाठी रक्कमेची मागणी केली होती. साक्षीदार स्वतः सांगते की, दयायचे असेल तर मुलासाठी दे असे मी म्हणाले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी पुर्नविवाह केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, तत्कालीन पोलीस आयुक्त श्री. राकेश मारीया यांची मी मदत घेतली होती. हे मला माहित नाही की, त्यांनी नेहरुनगर पोलीसांना तक्रार नोंदवून घेण्याचे निर्देश दिले किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस आयुक्तांच्या सांगण्याप्रमाणे मी नेहरुनगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

**१५.** हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला शारिरीक अथवा मानसिक त्रास कधीही दिला नाही. आरोपींनी माझ्या अंगावर रॉकेल टाकल्याचे मी तक्रार देताना पोलीसांना सांगितले होते. सदर बाब तक्रारीत नमूद असल्याचे सरकारी वकीलांना सांगितले. मी वरळी येथील खोलीचे कुलूप तोडून आत गेल्याचे माझ्या तक्रारीत का नमूद नाही याचे कारण मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना त्रास देण्यासाठी खोटी तक्रार दिली.

**उलट तपास पुर्ण...**

**फेर तपास काही नाही...**

दिनांकः २३/०१/२०२३ समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

स्वा./–

(सुहास प्र. भोसले)

महानगर दंडाधिकारी,

६२ वे न्यायालय, दादर, मुंबई